## महाराष्ट्र शासन

## जागतीक कृषि गणना या केंद्र शासन पुरस्कृत योजने अंतर्गत "तांत्रीक पर्यवेक्षक" या पदावर करार तत्वावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महीन्यासाठी नियुक्ती बाबतची जाहीरात.

जागतीक कृषि गणना या केंद्र शासन पुरस्कृत योजने अंतर्गत "तांत्रीक पर्यवेक्षक" या पदावर करार तत्वावर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात ११ महीन्याच्या कालावधीसाठी महाराष्ट्र कृषि सेवा वर्ग -१, वर्ग-२ व वर्ग-२ कनिष्ठ संवर्गातील सेवा निवृत्त अधिका-यामधून मुलाखतीव्दारे करार पध्दतीने भरणेसाठी पात्र व इच्छुक उमेदवाराकडून अर्ज मागविण्यात येत आहेत. करार तत्वावर भरावयाचे पदाचे नांव,पद संख्या, अनुभव व देय मानधन याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | योजनेचे नांव | पदनाम | पदसंख्या | देय मानधन |
|---|---|---|---|---|
| १ | जागतिक कृषि गणना | तांत्रीक पर्यवेक्षक | २ | रु २५,०००/- प्रती महिना किंवा शासन निर्णय क्र संकिर्ण-२७१५/प्र.क्र/१००/१३ दि.१७ डिसेंबर २०१६ नुसार नियुक्तच्या वेळी महा गाई भत्यासह मिळत असलेल्या निवृत्ती वेतना एवढी रक्कम (अंश राशीकृत निवृत्ती वेतन वगळून) यापैकी जे कमी असेल ते मासिक पारिश्रमिक म्हणून निश्चित करण्यात येईल. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार नियुक्ती करण्यात येईल |

खालीलप्रमाणे किमान अर्हता व अनुभव आवश्यक आहे.

| अ.क्र | पदाचे नांव | शैक्षणिक अर्हता | अनुभव | पदाची कर्तव्ये व जबाबदा-या |
|---|---|---|---|---|
| १ | तांत्रीक पर्यवेक्षक | कृषि शाखेतील पदवी/ पदव्युत्तर पदवी | कृषि गणना/सांख्यीक या कामाचा वर्ग-१ /वर्ग-२/वर्ग-२ कनिष्ठ पदावरील किमान ३ वर्षाचा अनुभव | दहावी कृषि गणना २०१५-१६ अंतर्गत फेज-२ व फेज-३ च्या क्षेत्रिय कामाची माहीती भरलेली रजिस्टर्स छाननी करणे/ डाटा तपासणी करणे/डाटा व्हॅलीडेशन करणे/त्रुटींची पूर्तता करुन घेणे व इतर अनुषंगीक कामे करणे |

संगणकाचे ज्ञान आवश्यक. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती वयाच्या ६५ व्या वर्षापर्यंत कार्यरत राहतील.

इच्छुक व पात्र उमेदवारांनी त्यांचे अर्जात सेवानिवृत्ती पूर्वी सांख्यिकी विभागात केलेल्या सेवेच्या तपशिलासह सविस्तर अर्ज जाहीरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून आठ (८) दिवसाच्या आत **उपआयुक्त (कृषि गणना), कृषि आयुक्तालय, कृषि भवन, २ रा मजला, शिवाजीनगर, पुणे-४११००५** यांचे कार्यालयात सादर करावेत.

**उपआयुक्त (कृषि गणना),**

**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-५**